# जाहिरात

प्रभागसंघ व्यवस्थापक पद भरती

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत आदर्श प्रभागसंघ (MODEL CLF) विकसित करण्यात येत आहे. उमेद अभियानामध्ये गरीब, अतिगरीब कुटुंबातील महिलांचे स्वयंसहाय्यता समूह, ग्रामसंघ व प्रभागसंघ अशी त्रिस्तरीय संस्थीय संरचना करण्यात आलेली आहे. यामध्ये प्रभागसंघ हे स्वयंसाहाय्यता समूह व ग्रामसंघातील सदस्यांचे प्रतिनिधित्व करतात .त्यामुळे या संस्थेतील कार्यकारीणीने घेतलेल्या धोरणात्मक निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी तसेच प्रभागसंघांमध्ये प्रशासकीय व दैनंदिन कामकाजाचे नियोजन करण्यासाठी प्रभागसंघ व्यवस्थापक या समुदाय संसाधन व्यक्तीची नेमणूक करण्याबाबत, प्रभाग व्यवस्थापक निवडीबाबत मार्गदर्शक सूचना प्राप्त आहेत. उपरोक्त राज्य शासनाकडील सूचनानुसार सन 2024-25 या आर्थिक वर्षात सोलापूर जिल्ह्यात 20 आदर्श प्रभागसंघ कार्यरत आहेत

माहे Oct-2025 अखेर 25 पैकी 16 प्रभागसंघ व्यवस्थापक कार्यरत आहेत. उर्वरित 9 प्रभागसंघात **प्रति प्रभाग 01 याप्रमाणे खालीलप्रमाणे 09 आदर्श प्रभागसंघातील प्रभाग व्यवस्थापक याची निवड करावयाची आहे त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.**

| अ.क्रं | तालुका | प्रभाग | आदर्श प्रभागसंघ यादी | प्रभागसंघ व्यवस्थापक पद संख्या |
|---|---|---|---|---|
| 1 | अक्कलकोट | नागणसुर | संकल्प | 1 |
| 2 | माढा | भोसरे | हिरकणी | 1 |
| 3 | माढा | पिंपळनेर | निसर्गमहिला प्रभागसंघ | 1 |
| 4 | मंगळवेढा | संतदामाजी नगर | नारी शक्ती | 1 |
| 5 | पंढरपूर | लक्ष्मी टाकळी | जीवनज्योती महिला प्रभागसंघ | 1 |
| 6 | सांगोला | कडलास | सक्षम महिला प्रभागसंघ | 1 |
| 7 | सांगोला | जवळा | नवजीवन महिला प्रभागसंघ | 1 |
| 8 | पंढरपूर | रोपळे | उजाला महिला प्रभागसंघ | 1 |
| 9 | द.सोलापूर | भंडार कवठे | उडान महिला प्रभागसंघ | 1 |

**प्रभागसंघ व्यवस्थापक पदाकरिता पात्रता व निकष**

1.अर्जदार महिला 'उमेद' स्वयंसहाय्यता समूहाची सदस्य असावी.

2. कोणत्याही शाखेची पदवी परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

3. वय किमान 22 वर्ष ते कमाल 40 वर्ष असावे. (वय मोजताना ज्या महिन्यात भरती प्रक्रिया करण्यात येईल त्या महिन्याची पहिली तारीख गृहीत धरावी.)

4. 'उमेद' अभियानांतर्गत गटाचा हिशोबनीस किंवा ग्रामसंघ/प्रभागसंघ लेखापाल किंवा समुदायस्तरीय लेखापरिक्षक किंवा प्रेरिका किंवा वर्धिनी किंवा वरिष्ठ वर्धिनी किंवा बँक सखी किंवा आर्थिक साक्षरता सखी किंवा पशु सखी किंवा कृषी सखी किंवा मत्स्य सखी किंवा वन सखी किंवा मास्टर कृषी सखी किंवा कृषी उद्योग सखी किंवा कृती संगम सखी/CTC किंवा कृषी व्यवस्थापक किंवा पशु व्यवस्थापक किंवा मत्स्य व्यवस्थापक किंवा BDSP किंवा FL CRP इ. ('उमेद' अंतर्गत सर्व प्रकारच्या समुदाय संसाधन व्यक्ती) म्हणून काम करण्याचा किमान 3 वर्षाचा अनुभव असणे बंधनकारक आहे.

5. उमेदवार ज्या प्रभागासाठी अर्ज करणार आहे त्या प्रभागातील मुळची रहिवासी असणे आवश्यक आहे.

6. स्थानिक भाषेवर प्रभुत्व असणारी तसेच इंग्रजी, हिंदी भाषेमध्ये लिहिण्यास आणि वाचण्यास सक्षम असावी.

7. संगणकाचे ज्ञान असल्यास प्राधान्य देण्यात येईल. याकरिता संगणक प्रशिक्षणाचे प्रमाणपत्र सोबत जोडावे.

8.उत्तम सुसंवादी, नेतृत्व गुण असलेली व गरीब कुटुंबांच्या प्रश्नावर संवेदनशीलतेने काम करणारी असावी.

9. प्रभागसंघाचे कार्यकारी समिती सदस्य (EC), पदाधिकारी (OB) यांच्या कुटुंबातील नसावी.

10. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये (PRI) सदस्य नसावी.

11. अंगणवाडी सेविका, मदतनीस, आशा कार्यकर्ती म्हणून कार्यरत नसावी. कोणत्याही शासकीय संस्था/स्वयंसेवी संस्था (NGO) मध्ये सेवा देणारी तसेच स्था.स्व.सं.सदस्य/स्था.स्व.सं. पदाधिकारी इ. म्हणून कार्यरत नसावी.

12. स्वतःचे गाव सोडून नेमून दिलेल्या प्रभागातील गावांमध्ये प्रवास करून क्षेत्रकार्य करण्याची तसेच बाहेर गावी प्रशिक्षण/कार्यशाळा इ. करिता उपस्थित राहण्याची तयारी असणे आवश्यक आहे.

13. ज्या गट व ग्रामसंघाची सदस्य आहे, तो गट व ग्रामसंघ A किंवा B श्रेणीतील असणे आवश्यक आहे.

14. वंचित कुटुंबांतील सदस्य, विधवा, परितक्त्या, अ.जा., अ.ज., दिव्यांग, आदिम जाती/जमाती, एसइबीसी इ. प्रवर्गातील असल्यास प्राधान्य देण्यात येईल.

वरील निकषानुसार पात्र महिलानी प्रभागसंघ व्यवस्थापक (CLF Manager) पदासाठी अर्ज करावा.

सदर पद हे (समुदायस्तरीय संस्था )असून 11 महीन्याच्या करार तत्वावर भरण्यात येणार आहे.

प्रभागसंघ व्यवस्थापक यांना मानधन प्रती महा रू. 7200/- इतके मानधन अधिक रू.1500/- प्रवास भता सबधित प्रभागसंघद्वारे अनुज्ञेय राहील.

अर्जाचा नुमना प्रभागसंघस्तरावर उपलब्ध असून दिनाक 22/ 12 /2025 अर्ज सादर करण्याची शेवटचीआहे. तरी, इच्छुक उमेदवारानी आपला अर्ज वरील तालुका अभियान व्यवस्थापक, तालुका अभियान व्यवस्थापन कक्ष(वरील तालुके) येथे कार्यालयीन वेळेत दिनाक 16/ 12 /2025 ते दिनाक 22/ 12 /2025 रोजी साय.6.00 वाजेपर्यत सादर करावा. विहित मुदती नंतर अर्ज स्वीकारले जाणार नाहीत याची नोद घ्यावी.

**प्रकल्प संचालक**
**जि. ग्रा. वि. यं.तथा जिल्हा अभियान सहसंचालक**
**महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान ,**
**जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष, सोलापूर**